# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी
क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक २७५/२०२४ दिनांक:- २६/०७/२०२४.

## "एन.डी.टीव्ही मध्ये चिफ एडीटर तसेच महानगरपालिकेत ऑफिसर असल्याचे सांगुन हॉटेल व्यावसायिंकाना धमकावुन त्यांचेकडे खंडणी मागणाऱ्या सराईत आरोपीतास पकडण्यास काशिमिरा पोलीस ठाणेस यश"

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या हॉटेल व्यावसायिकांना धमकावुन त्यांचेकडून खंडणी मागणाऱ्या आरोपीविरूध्द काशिमिरा पोलीस ठाणे गु. रजि नं. ३४३/२०२४ भा.द.वि.सं. कलम ३८४ प्रमाणे व गु रजि नं । ३७६/२४ बी.एन.एस कलम ३०८(४), ३०८(२), २०४ प्रमाणे गुन्हे दाखल झाले होते. सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीताचा तात्काळ शोध घेणे बाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, सहा. पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे काशिमिरा पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांचे पथक करून आरोपीत याचा शोध घेणेकामी पथक उत्तरप्रदेश येथे रवाना करण्यात आले होते. आरोपीत याचा कानपुर, उत्तरप्रदेश तसेच उज्जैन, मध्यप्रदेश येथे तपास व शोध घेवुन आरोपी नामे १) जयेश भिकु सावंत, वय ४१ वर्षे, रा. राजकिय उन्नाव बस्ती, ५४, बी, कल्याणपुर, कानपुर, उत्तर प्रदेश २) हिमांशु जयपाल सिंग, वय २४ वर्षे, रा. राजकिय उन्नाव बस्ती, ५४, बी, कल्याणपुर, कानपुर, उत्तर प्रदेश यांना उज्जैन, मध्यप्रदेश येथून ताब्यात घेण्यात आले असून त्यांचेकडून खंडणी मागण्यासाठी वापरण्यात आलेला मोबाईल जप्त करण्यात आला आहे.

आरोपीत यांचेकडून काशिमिरा पोलीस ठाणेतील खालील गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १. | काशिमिरा पोलीस ठाणे | ३७६/२०२४ | बी.एन.एस. कलम ३०८(४), ३०८(२), २०४ प्रमाणे |
| २. | काशिमिरा पोलीस ठाणे | ३४३/२०२४ | भा.दं.वि.स. कलम ३८४ प्रमाणे |
| ३. | काशिमिरा पोलीस ठाणे | २४६/२०२२ | भा.दं.वि.स. कलम ४२०, १७०, ३४ |

आरोपी क्रं १ जयेश भिकु सावंत याचा गुन्हेगारी अभिलेख पडताळणी केली असता त्याचेविरूध्द खालीलप्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे दिसुन आले.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १. | दहिसर पोलीस ठाणे, मुंबई | २३३/२०१३ | भा.दं.वि.स. कलम ४२० |
| २. | मुंब्रा पोलीस ठाणे, ठाणे | ३४०/२०१३ | भा.दं.वि.स. कलम ४२०, ४६५, ४६८, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ४७१, ४०६, ३४ प्रमाणे |
| ३. | कासारवडवली पोलीस ठाणे, ठाणे | ११७०/२०१५ | भा.दं.वि.स. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ४०६, ३४ प्रमाणे |
| ४. | दहिसर पोलीस ठाणे, मुंबई | ८२६/२०१८ | भा.दं.वि.स. कलम ४२०, प्रमाणे |
| ५. | विलेपार्ले पोलीस ठाणे, मुंबई | ४५४/२०२३ | भा.दं.वि.स. कलम ३८४, ३८७, ३८८, ३४ प्रमाणे |
| ६. | भांडुप पोलीस ठाणे, मुंबई | ४५६/२०२३ | भा.दं.वि.स. कलम ३८५ प्रमाणे |

नमुद आरोपीतांना काशिमिरा पोलीस ठाणे गु रजि नं गु रजि नं I ३७६/२४ बी.एन.एस कलम ३०८(४), ३०८(२), २०४ या गुन्हयात दिनांक २५/०७/२०२४ रोजी अटक करण्यात आली असून दिनांक २९/०७/२०२४ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजूर आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक समीर शेख (गुन्हे) नेम काशिमिरा पोलीस ठाणे हे करीत आहेत.

वरील कामगिरी मा. श्री. मुधकर पांडे. पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, (परिमंडळ-१), श्री. डॉ. विजय मराठे, सहाय्यक पोलीस आयुक्त, (मिरारोड विभाग), वरीष्ठ.पो.नि/राजेंद्र कांबळे, पो.नि/समीर शेख (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पो.नि/योगेश काळे, पोउपनिरी/शिवाजी खाडे, पो.हवा./शिंदे, निकम, सोनकांबळे, मोहिले, पो.अंम/रवि कांबळे, संदिप चौधरी, राजेंद्र सुर्यवंशी, पो.हवा/जयप्रकाश जाधव नेम. मा. पो.उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ, १ यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

---------ooooo---------